




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक २६ । गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




सोमवंशी क्षत्रिय कासार समाज,
श्री कालिका देवी, अहिल्यानगर
माळ ४, वाहन : गजराज
मूर्तीकार : श्री धनंजय वेळापुरे.
छाया : विशाल येंडे.

# भरदिवसा घरात घुसून महिलेला लुटणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

## तोफखाना पोलिसांची कारवाई, पावणेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बोल्हेगाव (भोरमळा) येथे भरदिवसा घरात घुसून एका ५४ वर्षीय महिलेला चाकूचा धाक दाखवत गळा दाबून लुटणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात तोफखाना पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली क्रेटा कार, २७ ग्रॅम सोने आणि १६ हजार रुपये रोख असा एकूण ८ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

फिर्यादी सुनीता कैलास तुपेरे (वय ५४, रा. भोरमळा, बोल्हेगाव) या ९ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घरात एकट्या झोपलेल्या होत्या. त्यावेळी दोन अनोळखी इसमांनी घरात घुसून त्यांचा गळा दाबला आणि गळ्यातील मंगळसूत्र, कानातील टॉप्स व साखळी ओरबाडून घेतली. दुसऱ्या साथीदाराने चाकूचा धाक दाखवून कपाटातील १६ हजार रोख, सोन्याचे दागिने व २ मोबाईल असा एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा ऐवज लुटला होता. या ■ पान ४ वर



### कारवाई करणारे पथक

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पोहेकॉ अब्दुलकादर इनामदार, पोलीस अंमलदार अनिल रोकडे, बाळासाहेब भापसे, अमोल गाडे, भागवत बांगर, कपिल गायकवाड, सतीश शिंदे, तसेच दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू व अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

कुत्र्याच्या हल्ल्यात डोळा निकामी झालेल्या

# जागृतीला मिळाली नवदृष्टी

## सभापती प्रा. शिंदेंमुळे झाले उपचार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला केल्याने अवघ्या दीड वर्षाच्या जागृती बेलेकर या बालिकेचा एक डोळा निकामी झाला व तिच्या जीवावर बेतले होते. पण विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तिच्यावर शासकीय खर्चाने उपचार झाले व तिची दृष्टी परत आली आणि जीवही वाचला. जामखेड शहरातील बेल्हेकर वस्ती



येथील ही बालिका आहे. तिच्यावरील उपचारांसाठी मदत करण्यास पुढाकार घेतल्याबद्दल बेल्हेकर परिवाराने प्रा. शिंदेंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

याबाबतची माहिती अशी की, जामखेड येथील बेल्हेकर वस्ती येथील जागृती सौरभ बेलेकर हिला पिसाळलेला कुत्रा चावल्याने डोळ्यांना दुखापत होऊन शास्त्रक्रिया करावी लागली. तिचे वडील सौरभ बेलेकर हे शेतमजूर असल्याने ऑपरेशनचा खर्च करू शकत नव्हते. त्यामुळे दीड वर्षाच्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी मदत करावी, असा मोबाईल मेसेज विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांना तिच्या कुटुबीयांनी केला होता. त्याची त्यांनी तातडीने दखल घेतली व तात्काळ पुणे येथील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथे संपर्क करून जागृतीवरील सर्व उपचारांसाठी शासकीय मदत मिळवून दिल्याने निकामी होण्याची शक्यता असलेला जागृतीचा डोळा पूर्ववत झाला व तिला पुन्हा दृष्टीही मिळाली. तसेच कुत्र्याच्या हल्ल्याने झालेल्या जखमाही बर्या होऊन तिला जीवनदान मिळाले. उपचारानंतर ती आता डोळ्याने पाहत असून कुटुंबाने याबद्दल सभापती प्रा. शिंदे यांचे आभार मानून पुढील उपचारासाठीही मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. तशी ग्वाहीही प्रा. शिंदे यांनी दिली आहे. याबद्दल बोलताना प्रा. शिंदे यांनी एका चिमुकलीचा जीव वाचवता आला, यापेक्षा मोठं समाधान नाही, अशी भावना व्यक्त केली.

जागृतीवर कुत्र्याचा हल्ला होण्याची घटना तीन-चार दिवसांपूर्वी घडली. आई भांडी धुण्यासाठी घराच्या पुढील बाजूस पाणी आणण्यास गेली असताना, त्यावेळी घराच्या पाठीमागे खेळणार्या जागृतीवर पिसाळलेल्या कुत्र्याने जीवघेणा हल्ला केला. तिला चावा घेतला व नखाने ओरबाडले. यात तिच्या डाव्या डोळ्यातील बुबुळ बाहेर आले, रक्तस्त्राव सुरू झाला. कुटुंबीयांनी तिला तातडीने जामखेडच्या रुग्णालयात नेले, पण तेथे उपचार होत नसल्याने नगरला आणले. पण तेथेही उपचार होण्यास अडचण असल्याने तातडीने पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात नेले. तेथे शस्त्रक्रिया उपचारांसाठी सुमारे दोन लाखावर खर्च असल्याने शेतमजूर कुटुंबाने सभापती प्रा. शिंदेंकडे मदत मागितली. त्यांनीही ■ पान ४ वर

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी आमदार दाते सरांचा पुढाकार

# एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** सर्वसामान्य जनतेच्या अडचणीच्या काळात धावून



जाणे, त्यांच्या समस्या शासनदरबारी मांडणे आणि गरजूंना मदतीचा हात देणे, हीच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या आजवरच्या कार्याची ओळख राहिली आहे. गेल्या चाळीस वर्षापासून वेगवेगळ्या पदांवर काम करत असताना जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आमदार दाते सर यांनी आता दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठीही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या ■ पान ४ वर

# साईबनमध्ये चाकूचा धाक दाखवून तरुण–तरुणीला लुटणारा गजाआड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निंबळक बायपास रोडवरील साईबन परिसरात एका तरुण-तरुणीला चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले आहे. अक्षय भीमराव मोरे (वय २४, मूळ रा. सिंधफणा वडळी, जि. बीड, हल्ली रा. विळद, अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीतील मोबाईल, रोख रक्कम, पाकीट आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल व चाकू असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

फिर्यादी मनोज नानासाहेब गाडगे (वय २०, रा. नेप्ती) हे २७ सप्टेंबर रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास आपल्या मैत्रिणीसोबत साईबन परिसरातील एका छोट्या टेकडीवर बसले होते. त्यावेळी मोटारसायकलवरून आलेल्या आरोपीने त्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. मनोज यांच्या गळ्याला चाकू लावून त्यांच्या खिशातील पाकीट व रोख रक्कम, तसेच दोघांचे मोबाईल बळजबरीने हिरावून घेतले. या घटनेची कुठेही वाच्यता केल्यास जीवे मारण्याची ■ पान ४ वर

# नागापूरमधील कुख्यात भाकरे टोळीवर बीएनएस १११ अंतर्गत गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या नागापूर परिसरातील कुख्यात भाकरे टोळीवर एमआयडीसी पोलिसांनी धडक कारवाई करत त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या टोळीची दहशत मोडून काढण्यासाठी आता त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेतील (बीएनएस) संघटित गुन्हेगारीचे कलम १११ लावण्यात आले आहे. या टोळीतील सदस्यांवर यापूर्वी तब्बल २२ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील बोल्हेगाव फाट्याला लागून असलेल्या आराध्या पेट्रोलपंपाच्या पाठीमागे आणि हॉटेल बजरंगच्या बाजूला काही तरुण प्राणघातक शस्त्रांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. यावेळी प्रेम नरेंद्र भाकरे (वय २३), यश सुनील घाग (वय २३) आणि विशाल भाऊसाहेब पाटोळे (वय २४, तिघे रा. नागापूर, अहिल्यानगर) यांना जागीच पकडण्यात आले. त्यांच्याकडून देशी बनावटीचा ■ पान ४ वर

# महापालिका पेन्शनर्सच्या आंदोलनाला यश; दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक देण्याचे आयुक्तांचे आश्वासन!

## आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी सकारात्मक चर्चा; धरणे आंदोलन स्थगित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर पेन्शन मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारात सुरू असलेल्या पेन्शनर्सच्या धरणे आंदोलनाला अखेर यश आले आहे. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या शिष्टमंडळाने बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) सायंकाळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन चर्चा केली. या चर्चेदरम्यान आयुक्तांनी पेन्शनर्सच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत दिवाळीपूर्वी पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर संघटनेच्या वतीने सुरू असलेले धरणे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांनी दिली.

महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक देण्यांचा प्रश्न अनेक दिवसांपासून चर्चेत होता. पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम आणि सहाव्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप मिळाले नसल्याने पेन्शनर्समध्ये नाराजी होती. या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने मंगळवारपासून



महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी हलगीच्या निनादात आंदोलन करून पेन्शनर्सनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले. दिवाळीचा सण जवळ आला असताना हक्काची आर्थिक देणी मिळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी सायंकाळी संघटनेच्या शिष्टमंडळाची आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी बैठक झाली. या बैठकीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक देण्यांसह विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक आणि सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते मिळावेत, ही मागणी मांडली. चर्चेसाठी संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात, मिलिंद वैद्य, रंगनाथ गावडे, मधुकर खताळ, दिलीप पाठक, ज्ञानेश्वर धिरडे, अंकुश कोतकर, अपाक शेख उपस्थित होते.

या चर्चेदरम्यान आयुक्तांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत दिवाळीपूर्वी पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित आर्थिक देण्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

पाचव्या वेतन आयोगाच्या थकीत फरकासोबतच सहाव्या वेतन आयोगाचे आठही हप्ते अद्याप मिळाले नसल्याचा मुद्दा आंदोलनादरम्यान प्रकर्षाने उपस्थित करण्यात आला. या प्रलंबित हप्त्यांची एकूण रक्कम अंदाजे ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम प्रशासनाने कोणताही विलंब न करता अदा करावी, अशी मागणीही संघटनेने केली. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी प्रदीर्घ काळ सेवा बजावल्यानंतर नियमानुसार मिळणाऱ्या आर्थिक लाभांसाठी वारंवार पाठपुरावा करावा लागणे, ही बाब चिंताजनक असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. प्रलंबित रकमेबाबत प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी आणि पेन्शनर्सना त्यांच्या हक्काची रक्कम वेळेत मिळेल, याची दक्षता घ्यावी, अशी ■ पान ४ वर

# सिद्धार्थनगरच्या विकासकामांचे पालकत्व स्वीकारले - उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

## अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौरॲड धनंजय जाधव यांच्या प्रयत्नातून सिद्धार्थनगर, जाधव मळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रयत्नातून सिद्धार्थनगर-जाधव मळा परिसरातील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या कामामुळे बालिकाश्रम रस्त्यापासून सिद्धार्थनगरमध्ये प्रवेश करण्याचा मार्ग अधिक सुकर होणार असून, परिसरातील नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

सिद्धार्थनगर हा कष्टकरी नागरिक आणि महानगरपालिकेतील कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असलेला परिसर आहे. गेल्या पाच वर्षांपासून या भागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासह विकासकामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यात येत आहेत. परिसरातील ड्रेनेज लाईन आणि रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे काही प्रश्न प्रलंबित होते. हे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले.

यावेळी बोलताना ॲड. धनंजय जाधव म्हणाले, ‘‘सिद्धार्थनगर हे माझे एक कुटुंब आहे. या भागातील विकासकामांचे पालकत्व मी स्वीकारले आहे. सर्वांना सोबत घेऊन विकासकामांच्या माध्यमातून या परिसराचा कायापालट केला जाईल. नागरिकांनीही जागरूक राहून आपल्या परिसरातील विकासकामांसाठी योगदान द्यावे. बालिकाश्रम रस्त्यापासून सिद्धार्थनगरमध्ये प्रवेश करण्यासाठीचा रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या माध्यमातून विकसित होत असून, त्यामुळे दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. विकासकामांसोबतच नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याचा माझा सातत्याने प्रयत्न असतो.’’

यावेळी किरण दाभाडे म्हणाले की, सिद्धार्थनगरमधील विकासकामांना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी यापूर्वीच सुरुवात केली असून, अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. बालिकाश्रम रस्त्यावरून सिद्धार्थनगरमध्ये येण्यासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. आता या रस्त्याचे कॉंक्रिटीकरणही मार्गी लागत आहे. सर्वांना सोबत घेऊन विकासकामे करणारे लोकप्रतिनिधी म्हणून ॲड. जाधव यांची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.

या भूमिपूजनप्रसंगी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक महेश लोंढे, ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत नवदुर्गा पूजन उत्साहात



अहिल्यानगर - आदिशक्तीच्या पूजनाचा नवरात्र उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. देवींच्या विविध रूपांची मनोभावे पूजा केली जात आहे. लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत मंगळवारी नव दुर्गा पूजनाचा कार्यक्रम झाला. चिमुकल्या मुलींनी नव दुर्गांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात सहभाग घेतला.यावेळी प्रमुख अतिथी माधवी गांधी, शाळेच्या संचालिका मनिषा बोगावत, संचालक विशाल बोगावत, शिक्षिका उपस्थित होत्या. नव दुर्गा पूजा करून सर्व मुलांना गिफ्ट देण्यात आले. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धिदात्री या नवदुर्गांचे पूजन नवरात्रीत नऊ दिवस केले जाते. राक्षस वध करणाऱ्या देवीचे रूपही यावेळी साकारण्यात आले. माधवी गांधी म्हणाल्या, लिटिल फ्लॉवर प्री स्कूल केवळ शाळा नसून मुलांसाठी एक मोठे संस्कार केंद्र आहे. मनिषा बोगावत या दोन दशकांपासून भावी पिढ्या घडवण्याचे काम करत आहेत. क्रमिक शिक्षण देतानाच मुलांमध्ये आपल्या परंपरा, आध्यात्म, संस्कार रूजवण्याचे कार्य केले जाते. मनिषा बोगावत म्हणाल्या, लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या चारही शाखांमध्ये सर्व सण उत्सव साजरे केले जातात. सारसनगर शाखेत नवदुर्गा पूजन कार्यक्रम घेऊन मुलांना देवीच्या विविध रुपांची ओळख करून देण्यात आली. स्त्री शक्तीचा जागर करण्यात आला. अशा कार्यक्रमांतून मुलांना आपल्या परंपरा, संस्कृतीशी जोडले जाते. सर्व उपक्रमांना पालकांचे मोठे सहकार्य लाभते. शेवटी विशाल बोगावत यांनी आभार मानले. आगामी दिवाळीनिमित्त तेजस बोगावत यांनी मुलांसाठी दि. ३१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवा मेकिंग आणि १ नोव्हेंबर रोजी तोरण मेकिंग कार्यशाळा सारसनगर येथील आर्ट व्हिला स्टुडिओ मध्ये आयोजित केली आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी संपर्क: ८००७५१५९००.

### शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त छबिना देवीची पालखी मिरवणूक; भाविकांची मोठी गर्दी



अहिल्यानगर - शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवातील तिसऱ्या माळेला या मंदिराची स्थापना करण्यात आली होती. या मंदिराचा वर्धापन दिनही उत्साहात साजरा करण्यात आला. श्री तुळजाभवानी माता मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, देवी नवसाला पावते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या मंदिराची ओळख 'नगरची देवी' म्हणून निर्माण झाली आहे.शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक धार्मिक वातावरणात छबिना देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येत आहे. मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी भाविक पालखीचे दर्शन घेत असून, भक्तिभावाने देवीची पूजा-अर्चा करत आहेत. 'श्री तुळजाभवानी मातेचा जयजयकार' आणि देवीच्या नावाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे.श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असून, दर्शनासाठी भाविकांना रांगेत उभे राहावे लागत आहे. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पारंपरिक पद्धतीने धार्मिक विधी आणि पूजाअर्चा करण्यात येत आहे.उत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाच्या वतीने भाविकांच्या दर्शनासाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे. भाविकांना सुलभतेने दर्शन घेता यावे, यासाठी आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. नवरात्रोत्सवामुळे श्री तुळजाभवानी माता मंदिर परिसरात मंगलमय आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## सनातन धर्मसभा: शारदीय व्याख्यानमाला

### यशस्वीतेसाठी मनातील आनंद विचारांतून प्रगट व्हायला हवा – अनिरुद्ध देवचक्के



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अध्यात्माचे अधिष्ठान लाभले की आत्मा परमात्म्याशी एकरूप होतो. त्यातून मिळणारी प्रसन्नता मनाला ऊर्जात्मक आनंद मिळवून देते आणि हाच आनंद जेव्हा आपल्या विचारातून प्रगट व्हायला लागतो तेव्हा यशस्वी होणं आणखी सोपं होऊन जातं, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अनिरुद्ध देवचक्के यांनी केले.

अहिल्यानगर येथील सनातन धर्मसभेच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित शारदीय व्याख्यानमालेत अंतर्मन ते आत्मभान : शरीर, मन आणि अध्यात्माचा प्रवास या विषयावर ते बोलत होते.

'' आत्म रक्षा, कुटूंब रक्षा, स्त्री रक्षा, गो रक्षा, देश रक्षा आणि धर्म व संस्कृती रक्षा ही माणसाची आद्य कर्तव्ये आहेत. या कर्तव्यांचा पालन करताना अध्यात्मिक विचारांचा आधार घेऊन स्वतःच मन, बुद्धी आणि आत्मा बळकट आणि समर्थ बनवणं आवश्यक आहे. धर्मग्रंथांचे अध्ययन, संत साहित्यातील विचारानुरूप आचरण, थोरामोठांशी सतत संवादी राहून विचारांचं आदान प्रदान करत राहणं हेच खरंतर परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे लक्षण आहे. सध्याच्या मानसिक दृष्ट्या अस्थिर अशा वातावरणामध्ये माणसाचं हायपर होणं, नकार पचवण्याची क्षमता नाहीशी होणं आणि छोट्या-मोठ्या कारणांसाठी हमरी-तुमरीवर उतरणं वाढत चाललेलं आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे प्रत्येक क्षणाला काहीतरी नवीन विचार ही आसक्ती वाढत चाललेली आहे. त्यामुळे कोणत्यातरी एका विचारावर सखोल मंथन करण्याची क्षमता नष्ट होत चाललेली आहे. वैचारिक दृष्ट्या हा कमकुवतपणा आपल्या प्रगतीसाठी अत्यंत घातक आहे. स्वस्थ आणि समृद्ध समाजाचे हे लक्षण नव्हे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, ''समाजातील प्रत्येक घटकाचे व्यक्तिमत्व परिपूर्ण बनवून उन्नत आणि प्रगतशील समाजासाठी झटत राहणं हे आपलं ध्येय असायला हवं.त्यासाठी सर्व सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक संघटनांनी सामाजिक एकोपा आणि बळकटीकरण करण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यातूनच भविष्यात समाजाला पोषक अशी पिढी निर्माण होऊ शकेल,'' असा विश्वास अनिरुद्ध देवचक्के यांनी व्यक्त केला. व्याख्यानाच्या सुरुवातीला संस्थेचे मंत्री दिनकर देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे मंत्री रमेश देशपांडे यांच्या हस्ते अनिरुद्ध देवचक्के यांचा सत्कार वेदमूर्ती उमेश वाळुंजकर यांनी केलेल्या मंत्रघोषात करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार उमेश नगरकर,उदय वाईकर, अनंत देशपांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## आयुक्त साहेब अवास्तव पाणी वापरण्यावर कारवाई करा- सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळ जन्य परिस्थिती निर्माण झाली असताना शहरातील नागरिक पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय करीत असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी मा. आयुक्त अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्या शहरातील उपनगरा मध्ये अनेक कॉलनी मध्ये बंगल्या समोर नागरिक मोठ्या प्रमाणात सडा मारून तसेच गाड्या धुवून पाण्याचा अपव्यय करीत असल्याचे प्रखरतेने दिसून येते. या नागरिकांना कोणी पाण्याचा अपव्यय करू नये अशी समज दिली तरी ते ऐकत नाही या करिता महानगर पालिकेनेच जर स्कॉड नेमून या लोकांना पाण्याचा अवास्तव वापर करण्यापासून प्रतिबंद केला तर नक्कीच थोडे का होईना याची मदत दुष्काळजन्य परिस्थीतीत महानगरपालिकेला होईल.

वास्तविक पाहता अनेक महानगरपालिकेने अवास्तव पाणी वापरण्यापासून प्रतिबंद करीत पाण्याचे कनेक्शन वर मीटर लावलेले आहेत त्या मुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होते, त्याच धर्तीवर महानगरपालिकेने सुद्धा पाण्याचे कनेक्शनला मीटर लावून जितके पाणी वापरले जाईल तितकेच पाण्याचे कर आकारण्यात यावे अशी मागणीही बोज्जा यांनी केली आहे. अनेक नागरिक त्यांच्या मालकीच्या बोअरचाही मोठी प्रमाणात पाण्याचा अनावश्यक वापर करीत असल्याने जमिनीतील भूजल पातळीही खोल गेली असल्याचे सांगण्यात येत आहे या साठी महानगरपालिकेने या बाबत गंभीर विचार करून कारवाई करावे व जरूर पडल्यास अवास्तव पाणी वापरणाऱ्यांची नावे सांगितल्यास योग्य बक्षीस दिले जाईल अशी योजनाही पालिकेने राबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केले आहे.

## 'जय माता दी'च्या जयघोषाने दुमदुमले सर्जेपुऱ्यातील राधा–कृष्ण मंदिर

### माता की चौकीत भक्तीचा जागर!; सेवाप्रीत सोशल फाउंडेशनचा सामाजिक पुरस्काराने गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सर्जेपुऱ्यातील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा–कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'माता की चौकी' कार्यक्रमात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा अनोखा संगम पाहायला मिळाला. देवीच्या भक्तिगीतांनी मंत्रमुग्ध झालेले भाविक, महाकालचे तांडव नृत्य, महाकाली देवीचे आगमन आणि राक्षसवधाचा जिवंत देखावा, तसेच पंजाबी ढोलच्या तालावर रंगलेला रास गरबा अशा विविध कार्यक्रमांनी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. शीख आणि पंजाबी समाजबांधवांसह महिला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचा जागर केला.



माता की चौकीच्या कार्यक्रमात महाकालचे तांडव नृत्य, महाकाली देवीचे आगमन आणि राक्षसवधाचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. या देखाव्याने उपस्थित भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या या सादरीकरणाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी देवीच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या त्रिशा ओबेरॉय हिचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच भाविकांनी 'जय माता दी'चा एकच जयघोष केला. देवीच्या रूपातील तिच्या देखण्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

शिर्डी येथील नवदुर्गा जागरण ग्रुपच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात दिलप्रीतकौर बतरा यांनी देवीची विविध भक्तिगीते सादर केली. देवीच्या एकाहून एक सरस भक्तिगीतांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या भक्तिगीतांमध्ये भाविक तल्लीन झाले होते. देवीच्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमात भाविकांनी भक्तिगीतांचा मनमुराद आनंद लुटला. देवीच्या जयघोषाने वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागातून साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने नवरात्रोत्सवाचा उत्साह अधिकच वाढविला.

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात पंजाबी ढोलच्या ठेक्यावर महिलांनी रास गरबा नृत्य सादर केले. ढोलच्या तालावर थिरकणाऱ्या महिलांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

## एमआयडीसीमधील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या आरोग्य शिबिरांना भाविकांचा प्रतिसाद

### नवरात्र उत्सव काळात चालणाऱ्या मोफत आरोग्य शिबिरांचा लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तिमय वातावरणात साजऱ्या होत असलेल्या या नवरात्रोत्सवात ट्रस्टने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा विशेष जागर केला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना भक्तीबरोबरच आरोग्याची काळजी घेता यावी, या उद्देशाने विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्ट आणि आठरे पाटील मेमोरियल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१३ ऑक्टोबर) आयोजित करण्यात



आलेल्या आरोग्य शिबिरात अनेक भाविकांनी सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, हिमोग्लोबीन आदी विविध आरोग्यविषयक तपासण्या करण्यात आल्या. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांनी भाविकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून नियमित तपासणी, योग्य आहार आणि आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेकजण कामाच्या व्यापामुळे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी मधुमेह, उच्च रक्तदाब आणि इतर आजारांचे निदान उशिरा होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मंदिरात येणाऱ्या भाविकांना आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम ट्रस्टच्या वतीने राबविण्यात येत आहे. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजामध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हा प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरत आहे.

श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे आणि सचिन कोतकर यांच्या उपस्थितीत विविध आरोग्य शिबिर पार पाडत आहे. या शिबिरात डॉ. सुकेश बिश्वास आणि डॉ. विशाखा भळगट यांनी भाविकांची आरोग्य तपासणी केली.



**पुणे येथील कसब्याचे भाजप आमदार हेमंत रासने यांचा अहिल्यानगर येथे सत्कार करताना विशाल येंडे, आदिनाथ उर्फ बापू येंडे आणि ओंकार डांगरे.**

## अडूळच्या मुदस्सीर शेखची गोळाफेकमध्ये सुवर्णभरारी!

### जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक; पैठण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील अडूळ येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला, अडूळ येथील १४ वर्षीय विद्यार्थी मुदस्सीर जफर शेख , मूसा शेख यांच्ये नातू याने गोळाफेक या मैदानी क्रीडा प्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे अडूळ गावासह पैठण तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुदस्सीर याने आपल्या मेहनतीच्या आणि क्रीडा कौशल्याच्या जोरावर जिल्हास्तरीय स्पर्धेत अव्वल स्थान मिळवून शाळेचा आणि गावाचा नावलौकिक वाढवला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही उत्तम क्रीडा गुणवत्ता असून योग्य



मार्गदर्शन आणि सरावाच्या बळावर ते जिल्हास्तरावर यश संपादन करू शकतात, हे त्याने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. मुदस्सीरच्या या यशाबद्दल त्याचे कुटुंबीय, शिक्षक, शाळा व्यवस्थापन आणि पैठण चे आमदार विलास पाटील भुमरे व सरपंच उपसरपंच ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत असून पुढील क्रीडा स्पर्धांमध्येही त्याने अशीच उज्वल कामगिरी करावी, अशा शुभेच्छा दिल्या

## जामगावभाळवणी रस्त्याच्या दुरवस्थेवर बाबाजी तरटे आक्रमक; संभाजी रोहकले यांचीही दुरुस्तीची मागणी!

### टी. अँड टी. कंपनीचे लेखी आश्वासन हवेतच; २१ ऑक्टोबरपासून तरटे यांचा उपोषणाचा इशारा, रोहकले यांचे महामार्ग प्राधिकरणाला साकडे!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** भाळवणी (ता. पारनेर) नगरकल्याण राष्ट्रीय महामार्गाच्या कामादरम्यान खडी व मुरूम वाहतुकीमुळे जामगावभाळवणी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. या रस्त्याची दुरुस्ती करून देण्याचे लेखी आश्वासन टी. अँड टी. इन्फ्रा लिमिटेड कंपनीने दिले होते. मात्र, दुरुस्तीच्या कामाबाबत प्रश्न कायम असल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाबाजी भिमाजी तरटे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा २१ ऑक्टोबर २०२६ पासून उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

**खडी–मुरूम वाहतुकीमुळे रस्त्याची दुरवस्था**

नगरकल्याण महामार्गाचे काम सुरू असताना संबंधित परिसरातून खडी व मुरूम वाहतूक करण्यात आली. या वाहतुकीमुळे



जामगावभाळवणी रस्ता खराब झाल्याची बाब ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर टी. अँड टी. इन्फ्रा लिमिटेड, पुणे या कंपनीने १ सप्टेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायत भाळवणीला लेखी पत्र दिले होते. खराब झालेला रस्ता दुरुस्त करून देण्याचे तसेच काम पूर्ण झाल्यानंतर डांबराच्या मटेरियलचा वापर करून दुरुस्ती करण्याचे आश्वासन कंपनीने या पत्रातून दिले होते. मात्र, वर्षभराचा कालावधी उलटूनही रस्त्याच्या दुरुस्तीबाबत ठोस कार्यवाही झाल्याचे स्पष्ट होत नसल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

**खड्डे आणि धुळीमुळे नागरिक हैराण**

जामगावभाळवणी रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ उडत असून नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच अपघातांचा धोकाही वाढला आहे. त्यामुळे संबंधित कंपनीने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

**दुरुस्ती करा, अन्यथा उपोषण**

रस्त्याच्या दुरवस्थेची गंभीर दखल घेत बाबाजी भिमाजी तरटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. २१ ऑक्टोबर २०२६ पासून उपोषण सुरू करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ‘हमसफर’ लघुपटाच्या यशाबद्दल उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचा सन्मान



अहिल्यानगर - ‘हमसफर’ या उत्कृष्ट लघुपटाला ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात ‘सिल्व्हर लोटस’ हा मानाचा पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आल्याबद्दल उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचा दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या वतीने सन्मान करण्यात आला. या गौरवामुळे अहिल्यानगर शहराच्या नावलौकिकात भर पडली असून, मंदिराच्या भक्तगणांनी फिरोदिया यांचे अभिनंदन केले.यावेळी बोलताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया म्हणाले, ‘‘दक्षिणमुखी हनुमान मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मी दररोज या मंदिरात दर्शनासाठी येत असतो. येथे येणारा भाविकवर्ग निःस्वार्थ भावनेने सेवा करतो. कावट परिवारही मनापासून श्री हनुमानाची भक्ती करतो. मीसुद्धा दक्षिणमुखी हनुमानाचा भक्त आहे. श्री हनुमानाच्या कृपेनेच मला ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारातील ‘सिल्व्हर लोटस’ हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.’’ते पुढे म्हणाले, ‘‘हनुमानाच्या भक्तीतून काम करण्यासाठी शक्ती आणि ऊर्जा मिळते. आपल्या शहरावर आणि परिवारावर श्री दक्षिणमुखी हनुमानाची खरी कृपा आहे. त्यामुळेच चांगले कार्य करण्यासाठी बळ मिळते. देवस्थानाच्या भक्तगणांनी माझा जो सन्मान केला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.’’रामदास कावट म्हणाले की, ‘सिल्व्हर लोटस’ हा पुरस्कार म्हणजे उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या कर्तृत्वावर उमटलेली राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णमुद्रा आहे. या सन्मानामुळे मराठी चित्रपटसृष्टीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. आजच्या पिढीतील सर्जनशील कलाकारांसाठी हा पुरस्कार प्रेरणेचा दीपस्तंभ ठरेल.‘‘स्वप्न मोठे असावे, प्रयत्न प्रामाणिक असावेत आणि कलेशी नाते निष्ठेचे असावे, तर यशाची शिखरे गाठता येतात, याचे ‘हमसफर’ हे सुंदर उदाहरण आहे,’’ असे ते म्हणाले. या उल्लेखनीय यशाबद्दल लघुपटाचे निर्माते उद्योजक नरेंद्र फिरोदिया, दिग्दर्शक अभिजीत दळवी आणि ‘हमसफर’च्या संपूर्ण टीमचे दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या पुरस्कारामुळे अहिल्यानगर शहराच्या नावलौकिकात भर पडल्याचेही कावट यांनी सांगितले. या सन्मान सोहळ्याप्रसंगी रामदास कावट, साईनाथ कावट, अनिल झवर, दिलीप बिहानी, जगदीश हेडा, दत्तात्रय अखमोडे, बजरंग दरक, नंदू झवर, संजय गांधी, संजय कासट, राजेंद्र कांबळे, संजय इसार, रितेश राठी, राजू झंवर, राजेश सारवान, आशिष कावट आदींसह मंदिराचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे भिंगारमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

अहिल्यानगर- भगवान गौतम बुद्धांचा समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मैत्रीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भगवान गौतम बुद्धांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर पुष्पवृष्टी करून आणि मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौध्द धम्माचा स्विकार केला. या आठवणींना उजाळा देऊन बाबासाहेबांचा जयघोष करण्यात आला.या कार्यक्रमाला हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, संजय भिंगारदिवे, विकास भिंगारदिवे, जहीर सय्यद, ताराचंद ठोकळ, अशोक पराते, सर्वेश सपकाळ, रमेश वराडे, दीपक घोडके, विलास आहेर, रतन मेहेत्रे, अभिजीत सपकाळ, सखाराम अळकुटे, योगेश चौधरी, जालिंदर अळकुटे, सुधीर कपाळे, दशरथ मुंडे, अविनाश पोतदार, सरदारसिंग परदेशी, मुन्ना वागस्कर, निजाम पठाण, अविनाश जाधव, रामनाथ गर्जे, जोगिंदरसिंग, उमाशंकरसिंग पंडित, दिलीपराव ठोकळ, इंजि. अनिल सोळसे, सुहास देवराईकर, राजू कांबळे, दीपक घाडगे, मनोहर दरवडे, संतोष लुनिया, दीपक अमृत, विशाल भामरे, मनोज नागपुरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने बुद्धवंदना, स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण असे सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ धार्मिक किंवा ऐतिहासिक दिवस नसून, तो सामाजिक परिवर्तन, मानवी मूल्ये आणि समतेच्या विचारांचा जागर करणारा दिवस आहे. भगवान बुद्धांनी दिलेला करुणा, प्रज्ञा आणि मैत्रीचा संदेश तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला दिलेली समता आणि स्वाभिमानाची शिकवण आचरणात आणण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी धम्ममित्र संजय भिंगारदिवे आणि विकास भिंगारदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशरण व पंचशील घेण्यात आले.

# स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाचे धडे; विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व कापडी पिशव्यांचे वाटप**
**‘स्वच्छ, सुंदर, हरित व प्लास्टिकमुक्त अहिल्यानगर’ घडविण्यासाठी महानगरपालिकेचा पुढाकार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वच्छ सर्वेक्षण २०२६ आणि माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. लहान वयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या आणि पर्यावरणपूरक सवयी रुजविणे, तसेच त्यांना पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी करून घेणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ओला व सुका कचरा वर्गीकरण, प्लास्टिक बंदी, घरगुती कंपोस्टिंग आणि ३ अर्थात , , या तत्त्वांचे महत्त्व समजावून सांगण्यात येत आहे. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी सेंद्रिय खत कसे तयार करावे आणि सुक्या कचऱ्याचे पुनर्वापर व पुनर्चक्रण करण्यासाठी त्याचे स्वतंत्र संकलन कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून दिले जात आहे. प्लास्टिकमुक्त अहिल्यानगर ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

जनजागृती कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा शपथविधी आयोजित करण्यात येत आहे. यावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. स्वच्छतेचे महत्त्व केवळ माहितीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या दैनंदिन सवयींमध्ये त्याचा समावेश व्हावा, यावर विशेष भर देण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थी हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शाळेतून मिळालेला स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश आपल्या कुटुंबीयांपर्यंत, मित्रपरिवारापर्यंत आणि परिसरातील नागरिकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरापासूनच कचऱ्याचे वर्गीकरण सुरू करावे, प्लास्टिकचा वापर कमी करावा, पाणी आणि ऊर्जेची बचत करावी तसेच परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशा छोट्या-छोट्या कृतींमधून पर्यावरण संवर्धनाला हातभार लावता येऊ शकतो.स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करून त्यांना स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे दूत बनविण्यावर या अभियानात भर देण्यात येत आहे.

स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्लास्टिकमुक्त अहिल्यानगर घडविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत शहरातील

# सथ्था कॉलनी येथून रविवारी सकाळी जिनेश्वरी भक्ती यात्रेचे आयोजन

**हजारो भाविकांचा सहभाग, जिन शासन परंपरांचा जागर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासातील श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेव आराधनेनिमित्त रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजता स्टेशन रोडवरील सथ्था कॉलनी येथून भव्यदिव्य जिनेश्वरी भक्ती यात्रा काढण्यात येणार आहे. यात्रेचा समारोप आनंद तीर्थ समवशरण येथे होईल. जिनेश्वरी भक्ती यात्रेचे लाभार्थी सथ्था कॉलनी येथील आदेश राजमल चंगेडिया, अनिल पोखरणा, विजय गुगळे, संजय गुंदेचा हे चार परिवार आहेत.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य सत्यप्रभाजी म.सा. , पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात समर्पण चातुर्मासाची धार्मिक पर्वणी संपन्न होत आहे. यात जिनेश्वरी भक्ती यात्रा आणि श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना सर्वांसाठी मोठी अध्यात्मिक पर्वणी आहे.

जिनेश्वरी भक्ती यात्रेतून जैन धर्माविषयी आध्यात्मिक जागृती, गुरु भक्ती आणि जिनवाणी (भगवान महावीरांची दिव्य वाणी) चा प्रचार-प्रसार करण्यात येईल. यात जिनेश्वरी डोक्यावर घेतलेले भाविक, शेकडो साधू साध्वीजी, जैन ध्वज, विविध देवता, राजा राणीच्या वेशभूषेतील मुकुटधारी महिला, पुरुष, श्रावक श्राविका, भगवान महावीरांचे संदेश असलेले फलक घेतलेले भाविक, प्रत्येक परिवारातील आबालवृद्ध सहभागी होणार आहेत. वाद्यांच्या गजरात ही यात्रा निघेल. यात्रा मार्गावर आकर्षक सजावट, सुशोभीकरण करण्यात येत आहे. संपूर्ण नगर शहरासाठी हा भव्य अध्यात्मिक सोहळा ठरेल.

जैन परंपरा, तीर्थंकर भगवान महावीर यांचे श्रुत ज्ञान प्रत्येकाला आत्म कल्याणाच्या मार्गावर नेणारे आहे. चांगले जीवन जगण्याची कला या ज्ञानातून आत्मसात होते. परिवारिक सुखाची दिशा गवसते. आनंदी राहण्याचा मंत्र मिळतो. जिनेश्वरी भक्ती यात्रेतून जैन दर्शन, कर्म सिद्धांत, विनय, संयम, मोक्ष मार्ग असे संदेश दिले जाणार आहेत. अहिल्यानगर शहरासाठी ही अतिभव्य यात्रा ऐतिहासिक ठरणार आहे. समग्र जैन विचार, परंपरांचे दर्शन यात्रेतून नगरकरांना होईल.

समर्पण चातुर्मासातील विविध धार्मिक कार्यक्रमांची नगरमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. नगरसह राज्यातील तसेच देशातील भाविक मोठ्या संख्येने समर्पण चातुर्मासात गुरूदेवांचे दर्शन आणि मौलिक विचार ग्रहण करण्यासाठी येत आहेत. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा परिवार आहे. रविवारी निघणाऱ्या भव्य जिनेश्वरी भक्ती यात्रेत भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लाभार्थी परिवार तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी व कमिटी सदस्यांनी केले आहे. यात्रा प्रस्थानापूर्वी सर्वांसाठी सथ्था कॉलनी येथे नवकारशीची व्यवस्था करण्यात आली आहे.

# भाग्योदय विद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**तायक्वांदो, कुस्ती, गोळाफेक व हॅमर थ्रो स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश; संस्थेकडून अभिनंदन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भाग्योदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन केले आहे. तायक्वांदो, कुस्ती, गोळाफेक व हॅमर थ्रो स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली असून, यशस्वी खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नगर-अहिल्यानगर शहर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत वैष्णवी बाजीराव लेहणे (इयत्ता नववी) आणि ज्ञानेश्वर गणेश शिंदे (इयत्ता सातवी) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. यशराज रुपेश कांबळे (इयत्ता नववी) याने द्वितीय क्रमांक मिळविला. समर्थ विलास गायकवाड, बाळकृष्ण संदीप सातपुते (दोघेही इयत्ता नववी), तुषार सुदाम कावळे (इयत्ता अकरावी), विराज प्रकाश तांबडे (इयत्ता सातवी), चैतन्य राजू गुंजाळ आणि अवधूत आदिनाथ गुंजाळ (दोघेही इयत्ता सहावी) यांनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

कुस्ती स्पर्धेत साई भरत कांडेकर याने खुल्या गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर आशिष दीपक घाटविसावे (इयत्ता दहावी) याने ६५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच गोळाफेक व हॅमर थ्रो या मैदानी क्रीडा प्रकारांत श्रावणी कैलास टकले (इयत्ता अकरावी) हिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाचा गौरव वाढविला.

या सर्व खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडाशिक्षक सोपान तोडमल आणि प्रा. एकनाथ होले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने हे यश संपादन करता आले.

# कराटे स्पर्धेत सायली बडे हिला रौप्यपदक

**जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी; विद्यालयाकडून अभिनंदन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या १०८ श्री महंत पंडित सुच्चासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी सायली संतोष बडे हिने कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले.

सायलीने १७ वर्षांखालील मुलींच्या ४९ किलो वजनगटातील कराटे स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. तिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले.

सायलीच्या या यशाबद्दल सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अंजली शिरसाठ यांनी तिचे अभिनंदन केले. तसेच भविष्यातील क्रीडा स्पर्धांमध्येही तिने अशीच यशस्वी कामगिरी करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा दिल्या. क्रीडा शिक्षक महेंद्र थिटे यांचे सायलीला मार्गदर्शन लाभले. तिच्या यशाबद्दल त्यांनीही अभिनंदन करून पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भिंगार अर्बन को.ऑप.बँकेच्या सभासदांना १५% डिव्हिडंड वाटप

**सभासदांच्या हितासाठी पारदर्शक निर्णय हाच भिंगार बँकेच्या यशाचा पाया – आ.अक्षय कर्डिले**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भिंगार बँकेने नेहमीच व्यावसायिकांना, छोट्या-मोठ्या उद्योजकांना वेळोवेळी कर्ज वाटप करून आर्थिक उभारी दिली आहे. आज अनेक बँका कर्ज वाटप टाळतात; मात्र भिंगार बँकेने सभासदांच्या हिताला प्राधान्य देत विश्वासाने कर्जवाटप केले. सभासदांनीही योग्य वेळेत परतफेड केली, त्यामुळेच बँकेचे नाव जिल्ह्यात व राज्यात ठळकपणे टिकून आहे.बँकेने सभासदांशी आपले नाते घट्ट केले आहे . बँकेचे सर्व निर्णय पारदर्शक पद्धतीने चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांच्या संगनमताने घेतले गेले, हीच या यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन आ.अक्षय कर्डिले यांनी केले.

भिंगार अर्बन को. ऑप. बँक लि., भिंगार बॅकेच्या सभासदांना सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा डिव्हिड लाभांश १५% आ.अक्षय कर्डिले यांचे हस्ते बँकेच्या सभासदांना डिव्हिडंडचे वाटप करुन, डिव्हिडंड वाटपास सुरुवात करण्यात आली. यावेळी बॅकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी,संचालक राजेंद्र पतके, विष्णु फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव व, नामदेवराव लंगोटे, तिलोतमाबाई करांडे, अनिता भुजबळ, मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन व सभासद आदीं उपस्थित होते.

यावेळी साईदीप हॉस्पिटलचे डॉ.एस.एस दीपक म्हणाले की, भिंगार बँकेमुळे सभासदांना अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. ठेवी ठेवताना किंवा कर्ज घेण्याच्या प्रक्रियेत कुठलीही अडचण वाटत नाही. बँकेने निर्माण केलेला विश्वास प्रशंसनीय आहे. व्यवसायासाठी अन्यत्र जाण्याची आवश्यकता राहत नाही, कारण बँकेच्या माध्यमातूनच अनेक योजना उपलब्ध आहेत. आमच्या सारख्या डॉक्टरांना पेशन्टचे रिपोर्ट पाहून निर्णय घ्यावा लागतो परंतु या ठिकाणी बँकेच्या रिपोर्ट वरून बँकेची परिस्थिती चांगली आहे असे कळते. . यामुळेच परिसरातील छोटे उद्योग आज मोठ्या प्रमाणात उभे राहून प्रगती साधत आहेत, असे ते म्हणाले.

याप्रसंगी चेअरमन अनिल झोडगे यांनी ज्या सभासदांची बॅकेत खाती आहेत त्याचा लाभांश त्यांचे खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे. बॅक पुरवित असलेल्या आधुनिक बँकिंग सुविधांचा सभासदांनी व खातेदारांनी बँकेशी व्यवहार करुन लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी उपाध्यक्ष श्री. किसनराव चौधरी यांनी ज्या सभासदांनी आपले खाते बँकेत उघडले नाही अशा सभासदांनी आपले खाते बॅकेत उघडून घ्यावे म्हणजे डिव्हिडंड खात्यात वर्ग करणे सोयीचे होईल. त्याचप्रमाणे विविध शाखांमध्ये खाते असलेल्या खातेदारांनी आपला खाते नंबर व डिव्हिडंड खात्यात जमा करणेसाठीचा अर्ज आपल्या नजिकच्या शाखेत द्यावा असे आवाहन केले. यावेळी संचालक विष्णू फुलसौंदर यांची बँक्स असो व्हाईस चेअरमन पदी निवड ;झाल्याबद्दल त्यांचा बँकेच्या वतीने आमदार अक्षय कर्डीले यांनी सत्कार केला

# नवोदित साहित्यिक, गायक, व्याख्यात्यांना सनातन धर्मसभेने व्यासपीठ दिले - तांबोळी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** येथील सनातन धर्मसभेने शालेय व्याख्यानमालाद्वारे ज्येष्ठ साहित्यिकांबरोबरच नवोदित साहित्यिक, गायक, व्याख्याते यांना व्यासपीठ उपलब्ध करून आपली उज्ज्वल परंपरा चालू ठेवली आहे, असे प्रतिपादन चैतन्य संगीत साधना मंचचे संस्थापक श्रीराम तांबोळी यांनी केले.

आमच्या या संगीत साधना मंचमध्ये वय वर्षे २० ते ७५ पर्यंतचे कलाकार संगीत शिक्षणाचे ज्ञान आत्मसात करीत असून या कलाकारांना नवरात्रोत्सवात देवीची साधना करण्याची संधी सनातन धर्मसभेच्या पदाधिकार्यांनी दिली. संस्थेचे कार्यही पवित्र असून त्यामध्ये सहभागी करून घेतल्याबद्दल त्यांनी संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सुमारे १२२ वर्षांची अखंड परंपरा असलेल्या सनातन धर्मसभेच्या शारदीय व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प चैतन्य संगीत साधना मंचच्या विद्यार्थ्यांनी आपल्या संगीतमय भक्तीगीतांनी केले. सदरची सुंदर मैत्री सनातन धर्मसभेच्या श्री ज्ञानेश्वर सभागृह येथे सादर करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दुर्गादेवीची आरती श्रीराम तांबोळी व त्यांच्या सहकारी गायक कलाकारांच्या समवेत करण्यात आली.

यावेळी वेदमूर्ती उमेश वाळुंजकर, वेदमूर्ती प्रकाश कडेकर यांच्या मंत्रघोषात संपन्न झाली. सनातन धर्मसभेचे मंत्री दिनकर देशमुख यांनी उपस्थित कलाकारांचे स्वागत केले. रमेश देशपांडे यांनी आभार मानले. साऊंड व्यवस्था संस्थेचे संचालक उदय वैकर यांनी उत्तम ठेवली.

बुद्धिजीवी मानवाला पडलेले कोडे की मी कोण? कुठून आलो? कुठे जायचे आहे? आणि माझ्या भोवतीच्या सृष्टीचा आणि माझा निर्माता कोण? असे अनेक प्रश्न यांच्या उत्तराच्या शोधात कित्येक पूर्वसुरींनी आपले आयुष्य वेचले. ज्ञानार्जन आणि साधने अशा सुंदर विचारांच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीद्वारे सूत्रसंचालन डॉ. स्मिता यवतकर यांनी केले. त्यांनी ‘आली आली हो गोंधळाला’ हे गीत गाऊन संगीत मैफिलीची उंची वाढविली. कोणत्याही कार्यारंभी ते कार्य सुफळ संपन्न व्हावे म्हणून आपण सर्वजण श्रीगणेशाची स्तुती करतो, अशा श्रीगणेशाची स्तुती करणारे गीत सौ. सुषमा वैद्य यांनी यावेळी सादर केले. श्रीगणेश, लक्ष्मी, दुर्गा अशा विविध देवतांवर संस्कृतमध्ये भावपूर्ण स्तोत्र असणारे आद्य श्री शंकराचार्य यांना प्रणाम करून त्यांची दुर्गादेवीची स्मृतीपर कृपारचना ‘अहो गिरी नंदिनी’ ही रचना सादर करण्यात आली.

श्रीकृष्ण हा लहानांपासून वृद्धांपर्यंत सगळ्यांना जवळचा वाटतो. त्याच्या खोड्या, दही, दूध, लोणी, गाईगुरे, गोपिकांबरोबरील रासक्रीडा, महाभारताच्या युद्धात अर्जुनाला गीता सांगणारा हा कृष्ण, होळीच्यावेळी रंगात रंगून जाणारा कृष्ण यावर गीत गायिले आहे. ‘गोकुळात रंग खेळतो हरी’ ही रचना योगिनी अकडकर यांनी खूपच छान सादर केली.

रुक्मिणी एकदा रुसून जाते, तेव्हा विठ्ठलाला मोठा प्रश्न पडतो, तिला कसं समजवावं? विठ्ठल आणि रुक्माईसाठी गायिलेले गाणे ‘रुखुमाई रुखुमाई’ हे गीत डॉ. रूपाली कुलकर्णी व त्यांच्या सहकार्यांनी खूपच छान सादर केले. भक्तीगीतांमुळे कार्यक्रमाची रंगत त्यांनी वाढवली. ‘कौशल्येचा राम’ हे गीत सौ. अनुजा मुळे यांनी सुंदर सादर केले.

परमेश्वराची कृपा असेल तर प्रत्यक्ष मृत्यूही भक्तांना भय दाखवू शकत नाही. परमेश्वराच्या नुसत्या दर्शनाने संकटे दूर जातात, संकटे नाश पावतात. अशा संकटनाशक श्रीगणेशाची आराधना केली तर संकटे येतच नाहीत, अशी रचना असलेले गीत ‘झुळझुळ वाहे पुण्यजलाचा निर्झर हो’ हे गीत श्री. देशमुख यांनी सादर केले. ‘आदिमाया अंबाबाई माय भवानी तुझे लेकरू’, ‘नामाचा गजर’, ‘दशरथा हे घे पसायदान’, ‘हरी म्हणा’ आदि सुंदर भावगीते रूपाली कुलकर्णी, सौ. श्रुती कुलकर्णी, सुनील भंडारी, जयश्री कुटे यांनी सादर केली. त्यांना हार्मोनियमची साथसंगत प्रकाश शिंदे, तर तबलासंगत अजय पिंपळे यांनी केली. श्रीराम ताबोली यांच्या चैतन्य सुगम संगीत साधना मंचच्या कलाकारांनी विविध भक्तीगीते सादर करून उपस्थितांना भक्तीरसाचा आनंद दिला. सुरेख गायन, भावपूर्ण सादरीकरण आणि संगीताच्या मधुर स्वरांमुळे श्री ज्ञानेश्वर सभागृहातील श्रोतृवर्ग भक्तिमय वातावरणात तल्लीन झाला होता.

# राज्यस्तरीय व आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत न्यू लॉ कॉलेजचे दैदिप्यमान यश

## न्यू लॉ कॉलेजच्या वतीने यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी विविध राज्यस्तरीय व आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व तसेच वादविवाद स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करत महाविद्यालयाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर आयोजित कॉ. एकनाथराव भागवत राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद–वक्तृत्व स्पर्धेत न्यू लॉ कॉलेजचे विद्यार्थी कु. संपदा लांडगे आणि दिग्विजय येवले / आठरे यांनी द्वितीय क्रमांकाचा मानाचा करंडक पटकावला. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाची मान उंचावली आहे. तसेच पेमराज सारडा महाविद्यालय आयोजित शारदा करंडक स्पर्धेत कु. संपदा लांडगे आणि विकास ज–हाड यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेत लांडगे व ज–हाड यांच्याव्यतिरिक्त कु. ऋतुजा गावडे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. एल. एल. मोरे आणि प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या दैदिप्यमान यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष श्री. रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष मा. डॉ. विवेक भापकर, सचिव . अॅड. विश्वासरावजी आठरे पा., सहसचिव . मुकेश मुळे, खजिनदार .अॅड. दिपलक्ष्मी म्हसे पा. तसेच सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्यांनी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अर्चना परकाळे यांचा 'आदर्श समाजसेविका' पुरस्काराने गौरव

## महिला सक्षमीकरणाच्या कार्याची दखल; महिलांना दाखवली स्वावलंबनाची वाट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** महिला सक्षमीकरण, स्वयंरोजगार आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साई श्रद्धा फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा अर्चना चंद्रकांत परकाळे यांना स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने 'आदर्श समाजसेविका' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, दुर्बल घटकांतील महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि गरजू महिला व युवतींना स्वावलंबनाची दिशा दाखविणे या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

स्नेहबंध सोशल फाऊंडेशनच्या वतीने नुकतेच जिल्हास्तरीय उत्कृष्ट गौरी आरास स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते अर्चना परकाळे यांना आदर्श समाजसेविका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अर्चना परकाळे या साई श्रद्धा फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. समाजातील दुर्बल आणि गरजू घटकांतील महिलांना सक्षम करून त्यांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी त्या विविध उपक्रम राबवितात. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना शासकीय योजनांची माहिती देणे, त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे आणि विविध शासकीय प्रक्रियांमध्ये मार्गदर्शन करण्याचे कार्य सुरु आहे.

अनेकदा आवश्यक कागदपत्रे, दाखले आणि शासकीय योजनांची माहिती नसल्यामुळे गरजू महिला व युवती विविध लाभांपासून वंचित राहतात. ही अडचण लक्षात घेऊन परकाळे या महिलांना आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी मदत करतात. शासकीय योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करून महिलांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. महिलांचे सक्षमीकरण केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळावीत, या उद्देशाने अर्चना परकाळे विविध उपक्रम राबवितात. महिला आणि युवतींसाठी व्यावसायिक मार्गदर्शन, कौशल्यविकास शिबिरे आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत माहिती देण्याचे काम त्यांच्या माध्यमातून केले जाते.

महिलांमध्ये असलेल्या कौशल्यांना योग्य दिशा मिळाल्यास त्या स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात आणि कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात भर घालू शकतात. याच विचारातून महिलांना व्यवसायाच्या विविध संधींची माहिती देणे, त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे आणि आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करणे, यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास त्यांचे कुटुंब आणि पर्यायाने संपूर्ण समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकतो.



शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त आदिशक्तीचा शक्तीचा अहिल्यानगर महानगर पालिकेतील महिला कर्मचारी.

# १४ वर्षांखालील आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीला विजेतेपद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** १४ वर्षांखालील आंतरशालेय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावत दिमाखदार यश संपादन केले. सांघिक समन्वय, अफाट चपळाई, अचूक खेळ आणि विजयासाठीची जिद्दीच्या बळावर खेळाडूंनी स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली.

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या या यशस्वी संघातील सर्व खेळाडू पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, केडगाव येथे शिक्षण घेत आहेत. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता या खेळाडूंनी सिद्ध केली आहे. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध केलेली प्रभावी रणनीती आणि एकजुटीने केलेला खेळ यामुळे संघाला प्रथम क्रमांक मिळवण्यात यश आले. अंतिम सामन्यातही खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

या यशस्वी संघाला केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि स्वाती बारहाते यांचे मोलाचे मार्गदर्शन



लाभले. खेळाडूंच्या कौशल्यविकासासाठी नियमित सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण, सांघिक खेळाचे महत्त्व आणि सामन्यातील योग्य रणनीती यावर त्यांनी विशेष भर दिला. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हे यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध करावी, या उद्देशाने अकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात आहे. बास्केटबॉलसारख्या सांघिक खेळातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि संघर्ष करण्याची वृत्ती विकसित होत असल्याचे या यशातून स्पष्ट झाले आहे.

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, संदीप वाकचौरे, रोहिणी ठुबे, अकॅडमीच्या खजिनदार रोहिणी कोतकर तसेच ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे संचालक प्रसाद जमदाडे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

खेळाडूंनी मिळवलेले हे यश केवळ अकॅडमीपुरते मर्यादित नसून, संपूर्ण केडगाव परिसरासाठी अभिमानाची बाब आहे. खेळाडूंनी यापुढेही सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवावे, अशी अपेक्षा व्यक्त करत मान्यवरांनी त्यांना पुढील राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी मिळवलेल्या या यशामुळे परिसरातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक उत्साह वाढण्यास मदत होणार आहे.

# शाळांच्या विकासात समाजाचे योगदान महत्त्वाचे – बा. ठ. झावरे

## वासुंदे जिल्हा परिषद शाळेत 'मिशन आपुलकी'तून मदत



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करणारे संस्कारकेंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेऊन योगदान देणे गरजेचे आहे. 'मिशन आपुलकी'सारख्या उपक्रमांमुळे शाळांना आवश्यक साहित्य व सुविधा उपलब्ध होत असून, त्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. समाज आणि शाळा यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या तर त्यांच्या गुणवत्तेला आणि आत्मविश्वासाला निश्चितच चालना मिळेल, असे मत गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा. ठ. झावरे यांनी व्यक्त केले.

वासुंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मिशन आपुलकी'च्या माध्यमातून शाळेला आवश्यक मदत करण्यात आली. यावेळी शाळेतील शिक्षक प्रल्हाद भालेकर यांची बदली झाल्याने त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निरोप देण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदत्त पतसंस्था चेअरमन बा. ठ. झावरे, होते. यावेळी केंद्रप्रमुख दिपक लोंढे सर, माजी सैनिक राजेंद्र शिर्के, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपटराव हिंगडे, माजी सरपंच विमल झावरे, पोपट द. साळुंके गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब सैद, शिक्षक नेते संतोष खामकर, दिलीप पाटोळे, पी. डी. बर्वे, पो. मा. झावरे, धनंजय महाराज उदावंत, अंबादास झावरे, बाळासाहेब झावरे, युवा नेते अमोल उगले, उद्योजक बापूसाहेब गायखे, मारुती उगले, बाळासाहेब शिंदे, प्रल्हाद भालेकर, बाळासाहेब खराबी, भाऊ वाकचौरे, भास्कर झावरे, गोपाळा बर्वे, किरण गायखे, बबन तळेकर, नितीन शिर्के मुख्याध्यापिका सुनिता रोहोकले, सहशिक्षिका संगिता शेळकंदे मॅडम व श्रीम. उषा पवार मॅडम आदी उपस्थित होते.

मिशन आपुलकीअंतर्गत प्रल्हाद भालेकर यांनी शाळेच्या नावाचे अॅक्रेलिक बोर्ड, तर माजी सैनिक राजेंद्र शिर्के यांनी वॉटर प्युरिफायर व सर्व मुलांसाठी स्पोर्ट ड्रेस देण्याची मदत केली. सुमन झावरे यांनी कपाट, अंबादास झावरे यांनी लेक्चर स्टँड, लोकवर्गणीच्या माध्यमातून स्पीकर यू.एस.बी. सिस्टिम, बाळासाहेब झावरे यांनी लेझीम, अमोल उगले यांनी प्रिंटर व कॉम्प्युटर सेट कै. एस.एल. झावरे यांच्या स्मरणार्थ मुली-पत्नी यांच्याकडून पिंपळी झाडे, स्टील डोल व ताशा देण्यात आले. शोभा हिंगडे यांनी , तर पारूबाई ढोकळे यांनी वॉल फॅन दिला. धनंजय महाराज उदावंत यांनी कापडी चटई, सहकारी दाते यांनी ग्रंथालयासाठी पुस्तके, तर बा.ठ. झावरे आणि पोपट साळुंके यांनी खुर्च्या दिल्या. रामदास झावरे यांनी रोपांसह सर्व कुंड्या उपलब्ध करून दिल्या. बबन तळेकर यांनी ५०००, तर सुभाष भालकेर यांनी २५०० आर्थिक मदत केली.

# बास्केटबॉलमध्ये आयकॉनच्या मुलींची विजयी पताका

## १४ वर्षांखालील संघाची हॅटट्रिक, १७ वर्षांखालील संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** द आयकॉन पब्लिक स्कूलच्या मुलींच्या बास्केटबॉल संघांनी आंतरशालेय स्पर्धेत शानदार विजय मिळवत शाळेचा गौरव वाढवला. दोन्ही संघांनी अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलच्या संघांना पराभूत करत विजेतेपदाची परंपरा कायम राखली.

१४ वर्षांखालील मुलींच्या संघाने २१९ अशा गुण फरकाने विजय मिळवत सलग तिसऱ्या वर्षी आपली विजयी परंपरा कायम राखली. तर १७ वर्षांखालील संघाने २२१० अशा फरकाने विजय मिळवून विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

या विजयात १७ वर्षांखालील गटातील वैष्णवी जगताप, इशिता ठुबे, राधिका पाटील, तनिष्का जगताप, आरना करनावत व अस्मि खताळ , तसेच १४ वर्षांखालील गटातील तेजस्विनी पाटील, माही माने, आरना कटारे, श्रेया वर्मा, उर्वी वारुळे व तनिष्का चंगेडिया यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

खेळाडूंना प्रशिक्षक सचिन भापकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा, अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

(पान १ वरून)

### भरदिवसा घरात घुसून महिलेला लुटणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ दोन पथके रवाना केली. पोलिसांनी घटनास्थळ आणि परिसरातील तब्बल १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास करत मनोज गोरख मांजरे (रा. श्रीरामपूर, हल्ली रा. अहिल्यानगर), उमेश दिलीप गायकवाड (रा. संगमनेर) आणि पवन ज्ञानेश्वर कुऱ्हाडे (रा. येवला, जि. नाशिक) या तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. अधिक तपास तोफखाना पोलीस करत आहेत.

### कुत्र्याच्या हल्ल्यात डोळा निकामी झालेल्या जागृतीला मिळाली नवदृष्टी

तातडीने शासकीय यंत्रणेला सूचना देऊन तिच्यावरील उपचार मार्गी लावले व भविष्यातही तिच्यावरील आवश्यक उपचारांसाठी मदत देण्याची ग्वाही दिली. दरम्यान, उपचारांनंतर जागृती पुन्हा डोळ्यांनी पाहू शकत आहे, ही बातमी मनाला मोठा आनंद आणि समाधान देणारी आहे, अशी भावनाही प्रा. शिंदे यांनी व्यक्त केली. तिच्या चेहर्यावरचं निरागस हसू असंच कायम राहावं आणि तिचं भविष्य आनंदाने उजळून निघावं, अशी शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केली.

### साईबनमध्ये चाकूचा धाक दाखवून तरुण–तरुणीला लुटणारा गजाआड

धमकी देऊन तो पसार झाला होता. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.वरिष्ठांच्या आदेशानुसार सपोनि हेमंत थोरात यांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष पथक स्थापन केले. या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी अक्षय मोरे याचा माग काढून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. चौकशीत त्याने या गुन्ह्याची कबुली दिली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजय कौटे हे करत आहेत.

**पथकात यांचा सहभाग**

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत थोरात, पोसई अजय कौटे, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, पोकॉ दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राजेश राठोड, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### नागापूरमधील कुख्यात भाकरे टोळीवर बीएनएस १११ अंतर्गत गुन्हा

गावठी कट्टा, जिवंत काडतुसे आणि डोळ्यात फेकण्यासाठी लाल मिरची पावडर असा घातक शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या कारवाईत अभिषेक ऊर्फ भोऱ्या अरविंद भिंगारदिवे आणि संग्राम सोन्याबापू कदम (दोघे रा. नागापूर) हे अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१० (४), ३१० (५) आणि आर्म अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत थोरात, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, पोकॉ दीपक फुंदे आणि नवनाथ दहिफळे यांच्या पथकाने केली.

**वर्तनात सुधारणा होत नसल्याने वाढीव कलम**

या आरोपींवर यापूर्वी जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न आणि हाणामारीचे तब्बल २२ गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी त्यांच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई केली होती; मात्र, तरीही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नाही. ते सातत्याने गंभीर स्वरूपाचे गुन्हे करत असल्याने टोळीची दहशत मोडून काढण्यासाठी त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीचे वाढीव कलम बीएनएस कलम १११ लावण्याचा प्रस्ताव एमआयडीसी पोलिसांनी पाठवला होता. अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्याने आता या गुन्ह्यात या कलमाची वाढ करण्यात आली आहे.

### एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द

सर्व आमदारांना एका महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी आपल्या एका महिन्याच्या मानधनाचा धनादेश उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे सुपूर्द केला. दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांसमोर निर्माण होणाऱ्या अडचणींची जाणीव ठेवून मदतनिधीसाठी दिलेले हे योगदान त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणे असो, संकटग्रस्तांना दिलासा देणे असो किंवा गरजेच्या वेळी मदतीसाठी पुढाकार घेणे असो, सर्वसामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका आमदार दाते सरांच्या या कृतीतून येते. राजकारण केवळ पदापुरते नाही, तर जनतेच्या संकटात उपयोगी पडण्यासाठी आहे.

### महापालिका पेन्शनर्सच्या आंदोलनाला यश; दिवाळीपूर्वी थकीत वेतन फरक देण्याचे आयुक्तांचे आश्वासन!

भूमिका संघटनेने मांडली. दिवाळीसारखा महत्त्वाचा सण जवळ आला असताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरखर्च, किराणा, औषधोपचार आणि इतर जीवनावश्यक गरजांसाठी आर्थिक तरतूद करावी लागते. अशा परिस्थितीत वेतन आयोगाचा थकीत फरक आणि प्रलंबित हप्ते मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आयुष्यभर केलेल्या सेवेच्या मोबदल्यात नियमानुसार मिळणारी देणी वेळेवर मिळणे आवश्यक आहे. मात्र, हक्काची रक्कम मिळवण्यासाठी सणासुदीच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याने पेन्शनर्सनी नाराजी व्यक्त केली. दिवाळीपूर्वी प्रलंबित रक्कम मिळाल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सण साजरा करण्यासाठी मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. महापालिका पेन्शनर्सचे प्रश्न सुटण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाठिंबा देऊन केलेल्या सहकार्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले आहे. या आंदोलनात कार्याध्यक्ष डी. यू. देशमुख, संजीव परशरामी, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर. बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, ठोकळ, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे, मुलानी, राजेंद्र बेंद्रे, रंजना भोसले, लता महाले, मीरा चव्हाण, अशोक विधाटे, रफिक शेख, संजय दगडे, मिलिंद नराल, जगदीश घोरपडे, बबन आढाव, राजू मेढे, बाळासाहेब नलगे, सुधाकर काशीद, हुसेन शेख, सादिक शेख, दत्तात्रय फडके आदींसह संघटनेचे पदाधिकारी व पेन्शनर्स यांनी सहभाग नोंफ्लदवला.

### सिद्धार्थनगरच्या विकासकामांचे पालकत्व स्वीकारले – उपमहापौर अॅड. धनंजय जाधव

मोहित पंजाबी, जितू गंभीर, जय भोसले, किरण दाभाडे, अभिजीत बोरुडे, सचिन शेलार, सागर ठोकळ, गौरव साळवे, करण साळवे, मनोज सुडके आदींसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील नागरिकांनी या विकासकामाचे स्वागत करून लोकप्रतिनिधींचे आभार मानले.